# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – 440 001 (म.रा.)

**Website : www.mafsu.ac.in**

## प्रवेशपुर्व अधिसुचना

(पशुवैद्यक पदवी अभ्यासक्रम प्रवेश 2021 –22)

या विद्यापीठाअंतर्गत बॅचलर ऑफ व्हेटरनरी सायन्स ॲण्ड ॲनिमल हजबंड्री (बी.व्ही.एस्सी. ॲन्ड ए.एच.) पदवी अभ्यासक्रमासाठी 2021–22 या शैक्षणीक वर्षात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना कळविण्यात येते की, सदर प्रवेशासाठी उमेदवाराने नॅशनल टेस्टींग ऐजंन्सी यांचेमार्फत घेण्यांत येणाऱ्या **NEET (UG) - 2021** या सामाईक प्रवेश परीक्षेस बसणे आवश्यक आहे. सदर परिक्षा **दिनांक 12 सप्टेंबर, 2021 (रविवार)** रोजी घेण्यात येणार आहे.

पशुवैद्यकीय पदवी प्रवेशाकरीता उमेदवार 12 वी (10 + 2) परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र/जैवतंत्रज्ञान आणि इंग्रजी विषयात एकत्रीतपणे खुल्या प्रवर्गाकरीता किमान 50% गुण व आरक्षित प्रवर्गाकरीता किमान 47.50% गुण घेवून उत्तीर्ण असणे आवश्यक असुन उमेदवाराने नॅशनल टेस्टींग ऐजंन्सी यांचे मार्फत घेण्यात येणारी पात्रता व प्रवेश परीक्षा **NEET (UG) - 2021** दिलेली असणे अनिवार्य आहे.

बी.व्ही.एस्सी. ॲन्ड ए.एच. पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश उमेदवाराच्या **NEET (UG) - 2021** हया परीक्षेतील गुणवत्तेनुसार करण्यात येतील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. प्रवेश परीक्षेच्या विस्तृत माहितीसाठी उमेदवारांनी **www.neet.nta.nic.in** हया संकेतस्थळाला भेट दयावी.

बी.व्ही.एस्सी. ॲन्ड ए.एच. अभ्यासक्रमाची प्रवेश अधिसुचना विद्यापीठातर्फे यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

दिनांक : 16/07/2021

(सचिन कलंत्रे)
कुलसचिव